# बसवंत गार्डन कट्टा




बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र तसेच बसवंत गार्डन हे दोन्ही प्रकल्प केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे; तर साऱ्या देशभरातील नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. येथे दिले जाणारे मधमाशी पालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण कृषी उत्पादन वाढ आणि मधमाशीजन्य पदार्थांच्या माध्यमातून होणारी रोजगार निर्मिती या दोन्ही बाबतीत पूरक ठरत आहे.

बसवंत गार्डन, आदर्श ग्राम संस्कृतीचे मॉडेल असलेले सेवरगांव या संकुलांमधील फळप्रक्रिया उद्योग, उपाहारगृह, सोविनीअर शॉपी, स्पोर्ट्स झोन, छोट्या मुलांसाठी खेळांच्या सुविधा असणारी स्वतंत्र जागा, पेंटिंग झोन अशी असंख्य आकर्षणे पर्यटकांना आकर्षित करतात. या परिसरात मधमाशी पालन व्यवसायाच्या संदर्भात परिसंवाद आयोजित केले जातात. मान्यवरांच्या सदिच्छा भेटी, अनेक शाळा व महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या सहलीही आयोजित करतात. या साऱ्या उपक्रमांची थोडक्यात माहिती.

## बसवंत गार्डन व मुखेड ग्रामपंचायतीचा अभिनव उपक्रम



झाडांचे जतन आणि सृष्टी संरक्षण यांचे सजीवांच्या जीवनात कळीचे महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन, बसवंत गार्डन व मुखेड ग्रामपंचायत (ता. निफाड, जि. नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने मुखेड परिसर तसेच समर्थ औद्योगिक वसाहत येथे वृक्ष लागवड करण्यात आली. दि. १३ जुलै रोजी राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विविध वयोगटांतील जागरूक नागरिक स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. पर्यावरण संवर्धनाचा असा स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दल परिसरातील ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.




'जागृती फाऊंडेशन'च्या सदस्यांनी बसवंत मधमाशी उद्यानाला नुकतीच भेट दिली, तसेच परिसरात वृक्षारोपणही केले.



नंदुरबार येथील 'पूर्वा केमटेक प्रा.लि.'चे डीलर बंधू श्री. कुंदन साळुंखे (जे.के.वाय. माता कृषी सेवा केंद्र) तसेच श्री. मनोज तेले (बळीराजा कृषी सेवा केंद्र) यांनी अलीकडेच बसवंत मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्र व बसवंत गार्डनला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत करताना बसवंत गार्डनचे प्रकल्प संचालक श्री. संदीप वाघ.

# बसवंत गार्डनला भेट : शैक्षणिक जीवनातच जाणून घेतले मधमाशी पालन आणि संवर्धनाचे महत्त्व...



महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या अंतर्गत असलेल्या पुणे येथील कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी.




कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर– पुणे (एम.बी.ए.) येथील विद्यार्थी.



के.के.वाघ माध्यमिक विद्यालय आणि उच्च माध्यमिक महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक.